मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# हिंदूंच्या संयमाचा अंत पाहू नका :आमदार शंकर जगताप

## धर्मांतराच्या षडयंत्राविरोधात काळेवाडीत 'आक्रोश' मोर्चा; दोषींवर कठोर कारवाईसाठी जनसमुदाय रस्त्यावर

**पिंपरी | प्रतिनिधी**

आमिषे दाखवून आणि अंधश्रद्धेचा प्रसार करून हिंदूंचे बेकायदेशीर धर्मांतर करणाऱ्या प्रवृत्तींविरोधात रविवारी काळेवाडीत 'आक्रोश मोर्चा' काढण्यात आला. 'काळेवाडी कन्वर्जन फाईल्स' मधील सत्य समोर आणून दोषींना शिक्षा व्हावी, या मागणीसाठी हजारो हिंदू बांधव आणि महिला या मोर्चात सहभागी झाल्या होत्या. "प्रशासनाने हिंदूंच्या संयमाचा अंत पाहू नये, अन्यथा पुढच्या परिणामांना सरकार जबाबदार असेल," असा इशारा आमदार शंकर जगताप यांनी यावेळी दिला.

काळेवाडीतील पंचनाथ चौक ते आबाजी नाणेकर चौक दरम्यान हा मोर्चा काढण्यात आला. या आक्रोश मोर्चात आमदार गोपीचंद पडळकर, आमदार उमा खापरे, ॲड. वर्षाताई डहाळे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, पक्षनेते प्रशांत शितोळे, नगरसेवक विनोद नढे, नगरसेविका नीता पाडाळे, कोमल काळे, सरचिटणीस वैशाली खाडये, चिंचवड-काळेवाडी मंडळ अध्यक्ष ॲड. हर्षद नढे, सामाजिक कार्यकर्ते काळूराम नढे तसेच विविध हिंदू सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




मोर्चाला संबोधित करताना आमदार जगताप म्हणाले की, "विज्ञानाच्या युगात प्रार्थना करून आजार बरे करण्याचे दावे करणे ही शुद्ध फसवणूक आहे. जर असे असते तर रुग्णालयांची गरजच उरली नसती. गरिबी आणि अज्ञानाचा फायदा घेऊन चाललेला हा धर्मांतराचा बाजार आम्ही पिंपरी-चिंचवडमध्ये चालू देणार नाही. महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करून आरोपींना १० लाखांपर्यंत दंड आणि कठोर शिक्षा झालीच पाहिजे."

यावेळी आमदार जगताप यांनी नागरिकांना आवाहन केले की, "आपल्या शेजारी काय घडतेय याकडे डोळेझाक करू नका. असे संशयास्पद प्रकार आढळल्यास तात्काळ प्रशासनाला किंवा आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना कळवा," असे आवाहन जगताप यांनी केले. तसेच, विधिमंडळात यावर चर्चा झाली असून मंत्र्यांनीही कारवाईचे निर्देश दिले असल्याचे त्यांनी नमूद केले.

### मोर्चातील प्रमुख मागण्या..

- » बेकायदेशीर धर्मांतर करणाऱ्या मुख्य सूत्रधारांना तात्काळ अटक करा.
- » अंधश्रद्धा पसरवणाऱ्या प्रार्थना स्थळांची चौकशी करून ती बंद करा.
- » पिंपरी-चिंचवडमधील सामाजिक सलोखा बिघडवणाऱ्यांवर मोक्कांतर्गत कारवाई करा.

गोपीचंद पडळकर म्हणाले, "महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य कायद्याच्या माध्यमातून अशा प्रकारांना लगाम घालण्याची तरतूद करण्यात आली असली, तरी त्याची काटेकोर अंमलबजावणी होणे तितकेच आवश्यक आहे. केवळ कायदे करून प्रश्न सुटणार नाहीत, तर प्रशासनाने अशा प्रवृत्तींच्या मुळाशी जाऊन त्यांना ठेचले पाहिजे. गरिबी आणि अगतिकतेचा फायदा घेऊन जर कोणी हिंदू समाजाला लक्ष्य करत असेल, तर आम्ही गप्प बसणार नाही. आजचा हा जनसमुदाय म्हणजे हिंदू समाजाच्या संतापाचा उद्रेक आहे. जर वेळीच कारवाई झाली नाही, तर हा आक्रोश संपूर्ण महाराष्ट्रात पसरेल आणि त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असेल."

# हिंजवडी—शिवाजीनगर मेट्रोला गती; 31 मेपर्यंत सेवा सुरू होण्याची शक्यता

## पहिला टप्पा बालेवाडीपर्यंत खुला होणार; आयटीयन्सना वाहतूक कोंडीतून मोठा दिलासा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेशातील वाहतूक व्यवस्थेत मोठा बदल घडवून आणणाऱ्या हिंजवडी माण ते शिवाजीनगर मेट्रो मार्ग 3 प्रकल्पाला वेग आला असून, माण-हिंजवडी ते बालेवाडी हा पहिला टप्पा येत्या 31 मेपर्यंत प्रवाशांसाठी खुला होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे दररोजच्या वाहतूक कोंडीतून आयटीयन्सची सुटका होऊ शकेल. प्रशासनाने अंतिम टप्प्यातील कामे युद्धपातळीवर सुरू केली आहेत



हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो सेवा 31 मेपर्यंत सुरू झाल्यास, ती केवळ प्रवास सुलभ करणारी सुविधा ठरणार नाही, तर पुण्याच्या वाढत्या शहरीकरणाला आधार देणारा महत्त्वाचा टप्पा ठरेल. आता सर्वांचे लक्ष मे च्या बैठकीकडे लागले आहे, जिथे या प्रकल्पाच्या उद्घाटनावर अंतिम शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे.

### वाहतूक कोंडीवर प्रभावी उपाय

» हिंजवडी, वाकड, बालेवाडी या भागांमध्ये सध्या प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. मेट्रो सुरू झाल्यानंतर सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम होईल; तसेच खासगी वाहनांवरील अवलंबित्व कमी होईल. त्यामुळे शहरातील वाहतूक व्यवस्थेला मोठा दिलासा मिळेल. पहिला टप्पा सुरू झाल्यानंतर उर्वरित मार्गाचे कामही वेगाने पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. संपूर्ण हिंजवडी-शिवाजीनगर मार्ग सुरू झाल्यास पुण्याच्या सार्वजनिक वाहतुकीत मोठी क्रांती घडेल.

# पिंपरी-चिंचवडमधील वीज समस्या सुटणार..!

## पिंपरी, चिंचवड, थेरगाव, रावेत, देहूगाव येथे उपकेंद्र होणार; खासदार श्रीरंग बारणे यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघातील पिंपरी, चिंचवड आणि मावळमधील भविष्यातील लोकसंख्या विचारात घेऊन वीज यंत्रणा सक्षम केली जाणार आहे. पुढील २० वर्षे डोळ्यासमोर ठेऊन वीज पुरवठ्याचे नियोजन केले जात आहे. त्यानुसार पिंपरी, चिंचवड, थेरगाव, रावेत, तीर्थक्षेत्र देहूगाव येथे उपकेंद्राची निर्मिती केली जाणार आहे. रहाटणीतही उतिउच्चदाब केंद्र सुरु केले जाणार असून नवीन रोहित्र बसविले जाणार आहेत. ताथवडेत अतिउच्चदाब केंद्र उभारण्यात येणार असल्याची माहिती शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली.



मावळ लोकसभा मतदारसंघातील पिंपरी, चिंचवड आणि मावळ विधानसभेतील विद्युत विषयक कामासंदर्भात खासदार श्रीरंग बारणे यांनी महावितरणाच्या पुण्यातील मुख्य कार्यालयात आढावा बैठक घेतली. चालू असलेली कामे, प्रलंबित कामे आणि प्रस्तावित कामांचा खासदार बारणे यांनी आढावा घेतला. प्रादेशिक संचालक सुनील काकडे, गणेशखिंड विभागाचे अधीक्षक अभियंता सिंहजीराव गायकवाड, ग्रामीणचे अधीक्षक अभियंता युवराज जरग, संजय नेते, कार्यकारी अभियंता सोमनाथ मुंडे, शेखर मुरकुटे, केशव काळुमाळी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेश खांडभोर यावेळी उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले, मामुर्डीतील उपकेंद्राचे मजबुतीकरण केले जाणार आहे. २२ केव्हीची भूमिगत वाहिनी टाकली जाणार आहे. थेरगाव, चिंचवड, रावेत, पिंपरी येथे उपकेंद्र कार्यान्वित केली जाणार आहेत. त्याअंतर्गत विविध कामे सुरु केली आहेत. देहूगाव येथे उपकेंद्राची निर्मिती केली जाणार आहे. ताथवडे येथे अतिउच्चदाब नवीन उपकेंद्र मंजूर आहे. यशदाच्या जागेत हे अतिउच्चदाब हे उपकेंद्र सुरु होणार आहे. येथील जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु आहे. रहाटणीतही उतिउच्चदाब केंद्र सुरु केले जाणार असून नवीन रोहित्र बसविले जाणार आहेत. त्याचे काम प्रगतीपथावर आहे. तळेगाव एमआयडीसीतील आंबीतील अतिउच्चदाब केंद्राची क्षमता वाढविण्यात येणार आहे. याबाबतचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

खासदार बारणे म्हणाले, विद्युत पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे विविध कामे हाती घेतली जाणार आहे. विद्युत विषयक कामांसाठी जिल्हा नियोजन समितीमधून निधी ठेवला जातो. त्यासाठी यंदा १७ कोटींचा निधी ठेवला आहे. प्रधानमंत्री सुर्यघर योजनेअंतर्गत जास्तीत-जास्त लोकांपर्यंत जाऊन रुफटॉप सोलर बसवून द्यावेत. स्मार्ट मीटर बसविण्याबाबत जनजागृती करावी. त्यांच्या तक्रारींचे निराकरण करुन मीटर बसवावेत. सबस्टेशनसाठी केंद्र सरकारकडून राज्य सरकारला जास्तीत-जास्त निधी आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. आत्तापर्यंत सर्वाधिक निधी महाराष्ट्राला मिळाला आहे.

### सुरळित वीजपुरवठा

» मावळ तालुक्यात तळेगाव दाभाडे, उर्से, अंबी, लोणावळा, पवनानगर येथे अति उच्चदाब केंद्र कार्यान्वित आहेत. लोणावळ्यात नांगराव येथे, तळेगाव दाभाडेतील अंबी, माळवाडी, मिंडेवाडी येथे लघुदाब व स्विचिंग उपकेंद्र कार्यान्वित आहे. यामुळे तळेगाव एमआयडीसी परिसरातील औद्योगिक ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठा सुरु झाला आहे. भंडारा डोंगर येथे विद्युतीकरणाची एक कोटी ३९ लाखांची कामे पूर्ण केली असल्याचेही बारणे यांनी सांगितले.

### गहुंजेत नवीन अतिउच्चदाब केंद्र..

» मावळ लोकसभा मतदारसंघातील विद्युत कामांसाठी जिल्हा नियोजन समितीमधून दरवर्षी मोठी निधी मंजूर करुन घेतला जातो. त्यातून विविध कामे केली आहेत. राजमाची गाव विद्युतीकरणासाठी एक कोटींचा निधी मंजूर आहे. वडेश्वर येथे नवीन उपकेंद्राचे काम प्रगतीपथावर आहे. गहुंजे येथे नवीन अतिउच्चदाब केंद्र प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यामुळे तळेगावातील अति उच्चदाब केंद्रावरील भार कमी होणार असून मावळ तालुक्यातील ग्राहकांना अंखडित वीज पुरवठा होण्यास फायदा होणार आहे. मिडेंवाडीतील अतिउच्चदाब केंद्रामुळे चाकण फेज टू या केंद्राचा भार कमी होऊन तळेगाव एमआयडीसीतील उद्योगांना फायदा होईल. या केंद्राचे काम प्रगतीपथावर असल्याचेही खासदार बारणे यांनी सांगितले.

# पिंपरीत उन्हाळ्याचा तडाखा; जलतरण तलावांवर मोठी गर्दी

## तापमान 41 अंशांवर; नागरिकांचा 'थंडा थंडा कुल कुल' अनुभवासाठी पूलांकडे ओढा

**पिंपरी | प्रतिनिधी**

मे महिन्यात उन्हाची तीवता वाढल्याने शाळकरी मुले, महिला, नागरिकांची कडाक्याच्या उन्हापासून आराम मिळण्यासाठी तसेच 'थंडा थंडा-कुल कुल' राहण्यासाठी जलतरण तलावांकडे धाव घेत आहेत. पोहणे हा केवळ एक व्यायाम नसून, उन्हाळ्यात शरीर थंड ठेवण्याचा एक उत्तम उपाय मानला जात आहे. मे महिन्यात तापमानाचा पारा एक्केचाळीसवर गेल्यामुळे पिंपरी शहरातील कै. अण्णासाहेब मगर जलतरण तलावांवर सकाळ आणि संध्याकाळच्या



वेळी पोहणाऱ्यांची मोठी गर्दी होत आहे.

सध्या शाळेला उन्हाळ्याची सुट्टी असल्याने लहान मुले आणि तरुण पोहण्याचा आनंद लुटत आहेत. त्यामुळे पिंपरीतील नेहरुनगर येथील कै. अण्णासाहेब मगर जलतरण तलावाकडे मफथंडाथंडा कुलकुल, उष्णतेपासून आराम मिळावा यासाठी शाळकरी मुले, तरुणाची संख्या सध्या वाढत चालली आहे. या गर्दीला आवर घालण्यासाठी जलतरण तलावांवर अनुभवी जीवरक्षक तैनात करण्यात आले आहेत. सुरक्षेचे कडक नियम लागू केले आहेत. या जलतरण तलावाकडे स्वच्छतेची काळजी, पाण्याचे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी आणि स्वच्छतेसाठी व्हॅक्यूम क्लीनिंग आणि निर्जंतुकीकरण नियमित केले जाते.

### सुरक्षेसाठी सुरक्षारक्षक तैनात

» या तलावाच्या देखरेखीसाठी सुरक्षारक्षक तैनात असतात. शिवाय एक सफाई कामगार आठ जीवरक्षक, सहा प्रशिक्षक या तलावाचे काम पाहतात. महिलांसाठी स्पेशल बॅच असतात. सकाळी दहा ते अकरा, सायंकाळी चार ते पाच वाजेपर्यंत चालू असते. सकाळी सहा ते दहा, सायंकाळी पाच ते रात्री नऊ सर्व साधारण मिक्स बॅच असतात. महिला व पुरुष तिकीट सर्व साधारण जनरल ऑनलाईन बुकिंग वीस रुपये आहे. पुलाची क्षमता एका वेळी ऐंशी लोकांची आहे. पोहयला येत असल्यास महिन्याची फिस 500 रुपये, तर पोहयचे शिकायचे असल्यास महिन्याला 300 रुपये आहे.

# वाघोलीतील महत्त्वाच्या 18 मीटर रस्त्यासाठी अतिरिक्त 8.17 कोटी मंजूर

## लेक्सिकॉन स्कूल–म्हसोबा मंदिर–केसनंद रोड मार्गामुळे वाहतूक कोंडी कमी होण्याची अपेक्षा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या वाघोली परिसरातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी पालिकेने आता कंबर कसली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या आणि वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत कळीच्या मानल्या जाणाऱ्या 'लेक्सिकॉन स्कूल ते म्हसोबा मंदिर ते केसनंद रोड' या १८ मीटर रुंदीच्या रस्त्यासाठी स्थायी समितीने अतिरिक्त ८.१७ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. यामुळे या भागातील वाहतूक कोंडी सुटण्यास मोठी मदत होणार असून आय.व्ही. इस्टेट परिसरातील नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

या रस्त्याच्या विकासासाठी महापालिकेकडे सुरुवातीला केवळ १.५० कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध होती. मात्र, प्रकल्प अहवालानुसार या कामाचा एकूण खर्च सुमारे ९.६७ कोटी रुपये इतका अपेक्षित आहे. अतिरिक्त निधीची उपलब्धता नसल्याने कामात अडथळा निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ७२ (ब) नुसार स्थायी समितीने मुख्य सभेची मान्यता घेण्याची प्रक्रिया सुरू केली आहे, अशी माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली. प्रशासनाने केलेल्या प्रत्यक्ष पाहणीत या मार्गावर अनेक तांत्रिक अडचणी समोर आल्या आहेत. नगर रोडजवळील या रस्त्याच्या मार्गावर काही ठिकाणी जमीन दलदलयुक्त असून मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याचे दिसून आले आहे. विशेष म्हणजे, रस्त्याच्या मूळ पातळीत ४ ते ५ मीटरपर्यंत तफावत असल्याचेही सर्वेक्षणात आढळले आहे. या गंभीर भौगोलिक परिस्थितीवर मात करण्यासाठी साध्या रस्ते बांधणीपेक्षा विशेष तांत्रिक उपाययोजनांची आवश्यकता आहे. यासाठी 'मे. इंफ्राकिंग कन्सल्टिंग इंजिनिअर्स प्रा. लि.' या तज्ञ सल्लागार संस्थेकडून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून घेण्यात आला आहे. त्यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली हे काम झाल्यास रस्ता दर्जेदार होईल आणि प्रकल्प वेळेत पूर्ण होईल, असा विश्वास पथ विभागाने व्यक्त केला आहे.

वाघोलीतील नगररोड ते आय.व्ही. इस्टेट दरम्यानचा हा मार्ग सध्या एका 'मिसिंग लिंक' सारखा आहे. हा १८ मीटरचा रस्ता पूर्ण झाल्यास नगररोडवरून थेट अंतर्गत भागात जाणे सोपे होईल. सध्या वाघोलीत वाढत्या शहरीकरणामुळे वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात वाढला आहे. केसनंद रोड आणि नगररोडवरील वाहतूक विभागली गेल्यामुळे मुख्य चौकांमधील कोंडी कमी होण्यास मदत होईल. उपलब्ध १.५० कोटी रुपयांच्या निधीच्या जोरावर एकूण ९.६७ कोटी रुपयांच्या कामासाठी निविदा प्रक्रिया राबविण्याचा प्रस्ताव प्रशासनाने ठेवला आहे. स्थायी समितीच्या मान्यतेनंतर आता हा प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी मुख्य सभेकडे धाडण्यात आला आहे. एकदा का प्रशासकीय आणि वित्तीय सोपस्कार पूर्ण झाले की, या रस्त्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात होईल.




### तांत्रिक अडचणींमुळे खर्च वाढला

**» या रस्त्याच्या विकासासाठी सुरुवातीला केवळ १.५० कोटी रुपयांची तरतूद होती. मात्र प्रत्यक्ष पाहणीत दलदलयुक्त जमीन, मोठ्या प्रमाणात साचणारे पाणी आणि रस्त्याच्या पातळीत ४ ते ५ मीटरपर्यंत तफावत असल्याचे आढळून आले. त्यामुळे विशेष तांत्रिक उपाययोजना आवश्यक ठरल्या. 'इंफ्राकिंग कन्सल्टिंग इंजिनिअर्स' या संस्थेकडून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून त्यानुसार एकूण खर्च सुमारे ९.६७ कोटी रुपये अपेक्षित आहे.**

### वाघोलीच्या पायाभूत सुविधांना गती

**» पुणे महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या वाघोली परिसरातील वाहतुकीच्या समस्यांवर उपाय म्हणून 'लेक्सिकॉन स्कूल ते म्हसोबा मंदिर ते केसनंद रोड' या महत्त्वाच्या रस्त्यासाठी अतिरिक्त ८.१७ कोटी रुपयांच्या निधीला स्थायी समितीने मंजुरी दिली आहे. या १८ मीटर रुंदीच्या रस्त्यामुळे नगररोड आणि केसनंद रोडवरील वाहतूक विभागली जाऊन कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. आय.व्ही. इस्टेट परिसरातील नागरिकांना यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे.**

> **"वाघोलीतील नागरिकांची वाढती संख्या लक्षात घेता, तेथील अंतर्गत रस्ते सक्षम करणे ही काळाची गरज आहे. लेक्सिकॉन स्कूल ते म्हसोबा मंदिर हा रस्ता या भागातील वाहतुकीचा कणा ठरेल. तांत्रिक अडचणी असल्या तरी योग्य निधी उपलब्ध करून हे काम मार्गी लावण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.**
> **- श्रीनाथ भिमाले, अध्यक्ष, स्थायी समिती, पुणे महापालिका**

# पुण्यात धोकादायक वास्तव! 673 टँकर फिटनेसशिवाय रस्त्यावर; आरटीओकडून कारवाई

## बिबवेवाडी-कोंढवा अपघातानंतर धक्कादायक माहिती समोर; फिटनेस तपासणीसाठी विशेष मोहीम सुरू

**पुणे | प्रतिनिधी**

आरटीओकडून फिटनेस तपासणी करताना वाहनाच्या प्रत्येक तांत्रिक बाबीची बारकाईने तपासणी केली जाते. यात प्रामुख्याने टायर आणि बेक टेस्ट केली जाते. यात टँकरचे टायर घासलेले तर नाहीत ना आणि बेक कार्यक्षम आहेत का, याची खात्री केली जाते. रात्रीच्या वेळी अपघात टाळण्यासाठी रिफ्लेक्टर्स आणि सर्व दिवे सुस्थितीत असणे अनिवार्य आहे. त्यामुळे पुणे परिसरातील मार्गावरील दिवेमधील कार्यालयात वाहनांची फिटनेस तपासणी केली जाते. याशिवाय इंजिनची क्षमता आणि प्रदूषण नियंत्रण मानके (पीयूसी) तपासली जातात. मूळ रचनेत बदल करून टँकरची साईज किंवा उंची बेकायदेशीरपणे वाढवली आहे का, हे देखील यावेळी पाहिले जाते. तसेच, चालकाचा परवाना, विमा आणि योग्यता प्रमाणपत्र यांची वैधता तपासली जाते.

उन्हाळ्यामुळे शहरात पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरची मोठी वर्दळ असते. मात्र, आरटीओच्या आकडेवारीनुसार, एकूण 2,094 पाणी टँकरपैकी 391 टँकर अनफिट आहेत. तसेच, इतर मालाची वाहतूक करणाऱ्या 2,292 टँकरपैकी 282 टँकरचे फिटनेस संपलेले आहे. म्हणजेच, एकूण 4,386 नोंदणीकृत टँकरपैकी 673 टँकर तांत्रिकदृष्ट्या रस्त्यावर धावण्यासाठी अपात्र आहेत.

अनेकदा जुन्या झालेल्या टँकरचे बेक निकामी होणे किंवा स्टेअरिंगवर नियंत्रण न राहिल्यामुळे मोठे अपघात घडतात. प्रशासनाने आवाहन करूनही अनेक टँकरचालक फिटनेस तपासणीसाठी आरटीओकडे फिरकलेले नाहीत. आता अशा अनफिट टँकरवर कारवाईची टांगती तलवार असून, पुणेकरांच्या सुरक्षेसाठी आरटीओकडून विशेष तपासणी पथके तैनात केली जाणार आहेत.




### फिटनेस तपासणीत काय तपासले जाते?

**» आरटीओकडून फिटनेस तपासणी करताना वाहनाच्या प्रत्येक तांत्रिक बाबीची बारकाईने तपासणी केली जाते. यात प्रामुख्याने टायर आणि बेक टेस्ट केली जाते. यात टँकरचे टायर घासलेले तर नाहीत ना आणि बेक कार्यक्षम आहेत का, याची खात्री केली जाते. रात्रीच्या वेळी अपघात टाळण्यासाठी रिफ्लेक्टर्स आणि सर्व दिवे सुस्थितीत असणे अनिवार्य आहे. त्यामुळे पुणे परिसरातील मार्गावरील दिवेमधील कार्यालयात वाहनांची फिटनेस तपासणी केली जाते. याशिवाय इंजिनची क्षमता आणि प्रदूषण नियंत्रण मानके (पीयूसी) तपासली जातात. मूळ रचनेत बदल करून टँकरची साईज किंवा उंची बेकायदेशीरपणे वाढवली आहे का, हे देखील यावेळी पाहिले जाते. तसेच, चालकाचा परवाना, विमा आणि योग्यता प्रमाणपत्र यांची वैधता तपासली जाते.**

# सुनेत्रा पवारांचा बारामतीत रेकॉर्डब्रेक विजय; अजितदादांचा विक्रम मोडला

## बारामती पोटनिवडणुकीत राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी 2 लाख 14 हजार 93 मताधिक्याने विजयी साकारला.

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती पोटनिवडणुकीत राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी २ लाख १४ हजार ९३ मताधिक्याने विजयी साकारला. त्यांना २ लाख १८ हजार ९३० मते मिळाली, तर त्यांच्याविरोधात असलेल्या २२ उमेदवार आणि 'नोटा' यांना ४८३७ मतांवर समाधान मानावे लागले. बारामतीत दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी २०१९ मध्ये केलेला मताधिक्याचा विक्रम उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मोडला.

अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेत निधनानंतर ही पोटनिवडणूक बिनविरोध होण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. मात्र, २२ उमेदवारांनी माघार न घेतल्याने मतदान घ्यावे लागले. या निकालाची औपचारिकता बाकी होती. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या अजित पवार यांचा बारामतीतील मताधिक्याचा विक्रम मोडणार का, याकडे सर्वांचे लक्ष होते. अपेक्षेप्रमाणे त्यांनी विक्रमी मताधिक्य मिळविले.

बारामती पोटनिवडणुकीसाठी मतदारांमध्ये निरुत्साह राहिल्याने सुमारे ५८.२७ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. या मतदारसंघात तीन लाख ८४ हजार ५७९ मतदार असून, त्यापैकी दोन लाख २४ हजार ८७ मतदारांनी मतदान केले. बारामतीतील मताधिक्याचा विक्रम दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावावर होता. अजित पवार यांनी २०१९ मध्ये भाजपचे तत्कालीन उमेदवार गोपीचंद पडळकर यांचा एक लाख ६५ हजार २६५ मताधिक्याने पराभव केला होता. हा विक्रम मोडून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या दोन लाख १४ हजार ९३ मताधिक्याने विजयी झाल्या.



### विरोधी उमेदवारांना अवघे ४८३७ मते

» या पोटनिवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार आकाश मोरे यांनी माघार घेतल्याने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह २३ उमेदवार रिंगणात होते. त्यामध्ये प्रमुख राजकीय पक्षाचा एकाही उमेदवार नव्हता. नोंदणीकृत राजकीय पक्ष असलेल्या न्यू राष्ट्रीय समाज पार्टीचे सोलापूरमधील आर. वाय घुटूकडे आणि हिंदुस्थान जनता पार्टीचे जत येथील सतीश कदम हे दोन उमेदवार आहेत. उर्वरित २० अपक्ष उमेदवार होते. त्यामध्ये बारामतीतीलच आठजण, राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या गावातील एक अपक्ष उमेदवार, धनंजय मुंडे यांच्या पत्नी करुणा मुंडे, अभिजित बिचुकले यांचा समावेश होता. 'नोटा'सह या सर्वांना मिळून अवघी ४८३७ मते मिळाली.

### 'अजित पवारांच्या स्मृतींना विजय समर्पित'

» बारामतीचा निकाल जाहीर झाल्यानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी विजयाचा जल्लोष नको, कुणीही मिरवणुका काढू नयेत किंवा गुलाल उधळू नये,' असे आवाहन कार्यकर्त्यांना केले. 'आपण सर्वांनी आपल्या मतांमधून दाखवलेला विश्वास मी अजितदादांच्या पवित्र स्मृतींना समर्पित करते,' अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. 'आजचा हा निकाल जाहीर होत असताना दादांच्या आठवणींना उजाळा मिळाल्याने आपण सर्वजण भावूक आहोत. दादांवर जीवापाड प्रेम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना नम्र विनंती आहे की, या विजयाचा जल्लोष म्हणून कुणीही मिरवणुका काढू नयेत किंवा गुलाल उधळू नये. आपण संयम राखूया आणि दादांच्या विचारांना साजेसं वर्तन करूया, असेही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी म्हटले आहे.

# बाह्यवळण मार्ग चार तास रोखून धरल्यानंतर सौम्य लाठीमार

## भोर तालुक्यातील नसरापूर येथे बालिकेवर अत्याचार प्रकरणानंतर बाह्यवळण मार्गावर आंदोलन करण्यात आले.

**पुणे | प्रतिनिधी**

'भोर तालुक्यातील नसरापूर येथे बालिकेवर अत्याचार प्रकरणानंतर शनिवारी (२ एप्रिल) सायंकाळी बाह्यवळण मार्गावर आंदोलन करण्यात आले. आंदोलनामुळे मुंबई-बेंगळुरु बाह्यवळण मार्गावरील चार तास ठप्प झाली होती. पोलिसांनी आंदोलक आणि पीडित बालिकेच्या कुटुंबीयांशी चर्चा केली. मात्र, काही जण आंदोलन मागे घेण्याच्या स्थितीत नव्हते, आंदोलनामुळे अनेक जण वाहतूक कोंडीत अडकून पडले होते. अखेर पोलिसांनी बळाचा वापर करुन सौम्य लाठीमार केला', असे पुणे पोलिसांनी स्पष्ट केले.

नसरापूर प्रकरणानंतर शनिवारी सायंकाळी बाह्यवळण मार्गावर नवले पूल परिसरात आंदोलन करण्यात आले. आंदोलकांवर पोलिसांनी लाठीमार केल्याची चित्रफीत रविवारी समाज माध्यमात प्रसारित करण्यात आली. त्यानंतर पुणे पोलिसांकडून याबाबत लेखी स्पष्टीकरण देण्यात आले आहे. परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांनी पोलिसांची बाजू मांडली आहे.

' नसरापूर अत्याचार प्रकरणानंतर शनिवारी दिवसभर पीडित बालिकेच्या कुटुंबीयांशी सातत्याने संवाद साधण्यात येत होता. कुटुंबीय थकले होते. पोलीस आणि प्रशासनाने त्यांना लेखी आश्वासन दिले होते. कुटुंबीयांची आंदोलन संपविण्याची इच्छा होती. बाह्यवळण मार्गावरील नवले पूल परिसरात गर्दी झाली होती. काही जण आंदोलन मागे घेण्यास तयार नव्हते. पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांच्याशी वेळोवेळी संवाद साधला. मात्र, काही जण अडवणूक करण्याच्या भूमिकेत होते. कुटुंबीयांना लेखी आश्वासन दिल्यानंतर त्यांना सुरक्षितपणे वाहनापर्यंत पोहचविण्यात आले. त्यानंतर रुग्णवाहिकेतून बालिकेचा मृतदेह पोलीस बंदोबस्तात अंत्यसंस्कारासाठी शनिवारी रात्री रवाना करण्यात आला. आंदोलन करणारे काही जण ठाम होते. त्यांना पांगविण्यासाठी सौम्य बलप्रयोग करण्यात आला आणि गर्दी हटविण्यात आली', असे पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.



### आंदोलनामुळे महामार्ग ठप्प

» नसरापूर अत्याचार प्रकरणाच्या निषेधार्थ शनिवारी नवले पूल परिसरात आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे मुंबई-बेंगळूरू बाह्यवळण मार्गावरील वाहतूक तब्बल चार तास ठप्प झाली. दुतर्फा सुमारे १५ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. हजारो प्रवासी, महिला, लहान मुले तसेच रुग्णवाहिकाही वाहतूक कोंडीत अडकून पडल्या होत्या, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

### न्याय मिळवून देण्याचे आश्वासन

» पुणे पोलिसांनी या प्रकरणाचा तपास संवेदनशीलतेने सुरू असल्याचे सांगितले आहे. आरोपीला कठोर शिक्षा मिळावी यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात असल्याचे पोलिसांनी नमूद केले. तपास प्रक्रियेत पीडित कुटुंबीयांना विश्वासात घेण्यात आले असून नागरिकांनी पोलीस आणि न्याययंत्रणेवर विश्वास ठेवावा, असे आवाहनही प्रशासनाकडून करण्यात आले आहे.